# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २३/१०/२०१८**

**सभा सुचना क्रं. १० स. ११.३० वा.**

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.११/१०/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- दि. ११/१०/२०१८ रोजीचे इतिवृत्त एकमताने कायम करण्यांस सभेने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जि.प.शाळा, अनाथ आश्रम, अनुदानीत शाळा व विनाअनुदानित शाळेतील विदयार्थीना किशोर वयीन मुलींना मासिक पाळीसाठीचे मार्गदर्शन करणेबाबत. | ठराव :- सदरच्या विषयावर चर्चा करण्यांत आली असून मा.महिला व बालकल्याण विभागांनी शिफारस केल्यानुसार महानरपालिका हद्दीतील जि.प.शाळा व विना अनुदानित, अनुदानित, अनाथ आश्रम शाळेत शिक्षण घेत असलेल्या किशोरवयीन मुलींना मासिक पाळीसाठींचे मार्गदर्शन करण्याकरीता महानगरपालिकेच्या संकेतस्थळांवर दरपत्रक प्रसिध्द करून स्थानिक इच्छुक ठेकेदार/सेवाभावी संस्था/खाजगी संस्था यांच्या मार्फत दरपत्रके मागविण्यात यावी. तसेच एका शाळेच्या मार्गदर्शनाकरीता ७००/- रु. याप्रमाणे ४०० शाळेंना मार्गदर्शनाकरीता अंदाजे २,८०,०००/- खर्चास ही सभा सर्वानुमदे मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती मार्फत महिलांसाठी उद्योजिका मेळावा बाबत. | ठराव :- सदरच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली असून मा.महिला व बालकल्याण विभागाचे शिफारस केल्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत उद्योजिक मेळावा आयोजन करण्यांत यावे. उद्योजिका मेळावा करीता लागणारे साहित्य महानगरपालिकेच्या वार्षिक मंजूर ठेकेदारांमार्फत घेण्यात यावे. ज्या बाबी मंजूर निविदेमध्ये नाही. त्याकरीता महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दरपत्रक मागवून कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत यावे. तसेच कार्यक्रमासाठी येणाऱ्या मार्गदर्शकांचे मानधन देण्यांत यावे व कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरीता येणाऱ्या ६,००,०००/- ) सहा लाख रुपये खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूर देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४. | अंगणवाडी/बालवाडीतील मुलांना शैक्षणिक साहीत्य पुरवठा करणे बाबत. | ठराव :- सदरच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली असून महिला व बालकल्याण समितीने शिफारस केल्यानुसार सन २०१९/२०२० या वर्षाकरीता अंगणवाडी/बालवाडीतील विद्यार्थ्यांना सॅग, टिफीन बॉक्स, वॉटर बॉटल इ. शैक्षणिक साहित्य आवश्यकतेनुसार वाटप करण्यांत यावे. सदरचे साहित्य वाटपाकरीता येणारा खर्च हा सन २०१९/२०२० या वित्तीय वर्षात मंजूर होणाऱ्या तरतुदीतुन करण्यांत यावा. सदरच्या साहित्य वाटपाकरीता ई-निविदा प्रक्रिया करण्याकरीता व अंदाजे येणाऱ्या रु. २५,००,०००/- रु. अश्ररी (पंचवीस लक्ष रुपये मात्र) खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) येथील प्रभाग क्र. ८२ मध्ये अलकापूरी येथील राजमाता नगर टर्न ते कालिका माता मंदीर पर्यंत अलकापूरी नाल्याकरीता संरक्षक भिंत बांधणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल रमेश साळुंखे सूचक :- मा.श्री.दिलीप यशवंत गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान व स्वच्छ वसई विरार मिशन यशस्वीपणे राबविणेकरीता स्वच्छता स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेबाबत. | ठराव :- सदरबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी स्वच्छ वसई विरार मिशन यशस्वीपणे राबविणेकरीता स्वच्छ स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेकामी आवश्यक साहित्य दरपत्रके मागवून खरेदी करणेंस व याकामी येणाऱ्या रक्कम रू. ५,५०,०००/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदावर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी ठोक वेतनावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यास पुनःश्च मुदतवाढ देणेबाबत. | ठराव :- संगणक विभागातील कामाची निकड पाहता ठोक वेतनावरील श्री. हर्षल रघुनाथ पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदत दि. १९/०९/२०१८ रोजी संपली आहे. संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन श्री. हर्षल रघुनाथ पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांना दि. २१/०९/२०१८ पासून पुढील सहा महिन्यां कराती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) अन्वये नेमणूक करण्यास तसेच ठोक वेतनावरील खर्चास आजची ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर खर्च महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स) या लेखाशिर्षामधुन भागविण्यांत यावा.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग जी अंतर्गत येणाऱ्या जूचंद्र विभागात भरणार दैनंदीन बाजार व आठवडा बाजार शुल्क वसुलीचा सन २०१८-१९ चा वार्षिक ठेक्यास (ई-निविदा) प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा करणेंत आली. प्रशासनाकडून बाजार दर समानीकरणाबाबत तसेच सन्मा. सदस्या यांनी केलेल्या सुचनांबाबत विस्तृत अहवाल सभागृहाला सादर करून पुढील सभेत पटलावर विषय घेण्यांत यावा. तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवणेंत येत आहे. यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ९. | मौजें गोखिवरे येथील क्षेपण भुमीतील डोझर दुरुस्ती करणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत आली. महानगरपालिका डोझर वाहनांचा वापर गोखिवरे कचरा डेपोवर दैनंदिन जमा होणारा कचरा लेव्हलिंग कामे होत आहे. डोझर वाहनांची चैन व इतर दुरुस्ती कामे निघाल्याने कचरा लेव्हलिंग कामी मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत. करीता डोझर वाहनांची निघालेली दुरुस्ती करणे कामी जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ३५,०७,९७०/- खर्चास ही सभा आर्थिक प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर नाना पाटील सूचक :- मा.श्री. नितिन दिनानाथ राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १०. | वसई विरार महानगरपालिका प्रभाग समितीतील ए,सी,एच व आय मधील ५ उद्यानामधील झाडांच्या व हिरवळीच्या वाढीसाठी मे.फिनोलेक्स प्लासऑन इंडस्ट्रीज प्रा.लि. यांच्याकडून शासकीय दर करारानुसार तुषार सिंचन पध्दत बसविणेच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त प्रस्तावावर सभागृहात चर्चा करणेत आली. प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अंतर्गत असलेल्या ५ उद्यानांमधे प्रस्तावात नमूद असलेले काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५(२)(२) नुसार मा. आयुक्त यांना निविदा न मागविता संविदा प्राधिकृत करणेविषयक तरतूद नमूद आहे. त्या अनुषंगाने मे. फिनोलेक्स प्लासऑन इंडस्ट्रीज प्रा. लि., कडून सूक्ष्म सिंचन पध्दत ई-ठिबक प्रणालीद्वारे राबविणेस सर्वानुमते मान्यता देणेत येत असून मा. आयुक्त यांना याकामी प्राधिकृत करणेत येत आहे व सदरच्या प्रस्तावास सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप यशवंत गोवारी सूचक :- मा.श्री. वैभव सुदाम पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत महानगरपालिका रुग्णालय/माताबाल संगोपन केंद्र येथे कार्यरत शववाहिनी, रुग्णवाहिका व्यवस्थापन सेवा बाहय यंत्रणेद्वारे (Out Sourcing) उपलब्ध करुन अनुभवी संस्थाकडून अभियक्ती स्वारस्य (EOI) मागविणेसाठी मंजूरी मिळणेबाबत | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत महानगरपालिका रुग्णालय/माताबाल संगोपन केंद्र येथे कार्यरत शववाहिनी, रुग्णवाहिका व्यवस्थापन सेवा बाहय यंत्रणेद्वारे (Out Sourcing) उपलब्ध करुन अनुभवी संस्थाकडून अभियक्ती स्वारस्य (EOI) मागविणेसाठी सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेकडे उपलब्ध ५ रुग्णवाहिका, १ कार्डियाक रुग्णवाहिका, २ शववाहिनी कार्यरत आहेत. सदर रुग्णवाहिका व शववाहिनी सेवा ही २४ तास सुरळीतपणे चालू ठेवणे गरजेचे आहे. महानगरपालिकेकडे असलेल्या शववाहिनी व रुग्णवाहिका चालकांच्या अपुऱ्या संख्येमुळे व रिलिव्हर उपलब्ध नसल्यामुळे एखाद्या चालकांच्या अनुपस्थित रुग्णालयातील कामकाजात अडथळा निर्माण होत आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिका रुग्णालय/माताबाल संगोपन केंद्र येथे कार्यरत शववाहिनी, रुग्णावाहिका व्यवस्थापन सेवा बाह्य यंत्रणेद्वारे (Out Sourcing) देणेकामी अनुभवी संस्थाकडून अभियक्ती स्वारस्य (EOI) मागविणेकरीता मा.वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि. ०५/१०/२०१८ ठराव क्र. ३० अन्वये केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने आजची स्थायी समिती सभा मंजूरी देत असून याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही स्थायी समिती प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत विजयनगर - तुळींज रुग्णालय येथिल कार्यरत डायलेसिस विभाग बाहय यंत्रणेद्वारे (Out Sourcing) उपलब्ध करुन अनुभवी संस्थाकडून अभियक्ती स्वारस्य | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाअंतर्गत विजयनगर-तुळींज रुग्णालय येथील डायलेसीस विभाग बाह्य यंत्रणेद्वारे (Out Sourcing) उपलब्ध करून अनुभवी संस्थाकडून अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मागविणेसाठी मंजूरी मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयातील डायलेसीस विभागात अपुऱ्या असलेल्या डायलेसीसच्या मशिनमुळे तसेच रुग्णालयात मानद तत्वावर अथवा कायम स्वरुपी नेफ्रोलॉजीस्ट विशेषतज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांना सदरची सेवा मर्यादित स्वरुपात देण्यांत येत आहे व सदरची सेवा ही अत्यावश्यक असून २४ तास नियमितपणे चालविणे गरजेचे असल्याने रुग्णालयातील डायलेसीस विभाग बाह्य यंत्रणेद्वारे (Out Sourcing) उपलब्ध करुन अनुभवी संस्थाकडून अभियक्ती स्वारस्य |

| | | |
|---|---|---|
| | (EOI) मागविणेसाठी मंजूरी मिळणेबाबत. | (EOI) मागविणेकरीता मा.वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती सभा दि. ०५/१०/२०१८ ठराव क्र. ३१ अन्वये केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने आजची स्थायी समिती सभा मंजूरी देत असून याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही स्थायी समिती प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्रीम. दिक्षा घरत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | सन २०१८-१९, २०१९-२०,२०२०-२१ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरीनेशन यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे कामी संविदा करणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली असून सन २०१८/१९, २०१९-२० व २०२०-२१ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरीनेशन यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे कामी कामाकरीता मे.ॲक्वामॅक एंटरप्रायजेस यांस समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा सुर्या व उसगाव योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लोरीनेशन यंत्रणेकरीता क्लोरीन गळती तपासक व शोषक (Chlorine gas leak detector & absorbption system) यंत्रणा बसविणे कामी संविदा करणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व मे.जी.एस कमर्शिअल कार्पोरेशन यांची प्राप्त अंदाजपत्रकीय दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून मे.जी.एस.कमर्शिअल कार्पोरेशन यांच्याशी कामाची संविदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | वसई विरार शहर महानगरपालिका उसगाव/शिरवली २० द.ल.ली पाणी पुरवठा योजना अतंर्गत अंथरण्यात आलेली शिरसाड फाटा येथील मृदू पोलादी शुध्द पाण्याची जलवाहिनी बदलणे तसेच चंदनसार MBR येथील Valves बदलणे कामी संविदा करणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व मे. ॲशलॉन एन्टरप्रायजेस यांची प्राप्त अंदाजपत्रकीय दराच्या रक्कमेच्या ०.९९% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून मे. ॲशलॉन एन्टरप्रायजेस यांच्याशी कामाची संविदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १६. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच मधील दिवाणमान तरण तलाव इमारत दुसऱ्या मजल्यावर शुटींग रेंजसाठी क्रीडा साहित्य पुरवठा करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. याकामी आर्म लायसन्स शस्त्रासाठी पोलिस विभाग व इतर शासकीय विभागांचे पुर्व परवानगी घेण्यांत यावी. तसेच याकामी पुढील निविदा कार्यवाहीसाठी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १७. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र.२५ मधील सहयाद्री नगर येथे आर.सी.सी नाला बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. दि. २८/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.श्री. एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ४.००% कमी दराने) निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत  सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १८. | विरार (प.) प्रभाग क्र.१७ मध्ये गोकुळटाऊनशिप मेन रोड ते सुंदरनगरपर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे.नेवाळकर एंटरप्रायजेस ह्यांची निविदा (अंदाजपत्रकीय दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी  सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १९. | विरार (प.) प्रभाग क्र.३ मध्ये चिखलडोंगरी येथे दशक्रिया विधी साठी शेडचे बांधकाम करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे.माता जिवदानी कनस्ट्रक्शन ह्यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा(-) १२.००% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.महेश पाटील  सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २०. | दहीहंडी उत्सवातील गोविदांचा विमा काढणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. प्रस्तावात नमुद प्रमाणे गोविदांचा विमा काढण्यासाठी झालेल्या अतिरीक्त खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच अतिरीक्त ८१९ गोविदांचा विमा खर्च अत्यावश्यक बाब म्हणून क्रीडा विभाग, लिपीक, श्री. ब्रिस्टन रॉड्रीक्स यांनी केलेला असून सदर कामी झालेला खर्च रु. ६१,४२५/- त्यांना अदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे. प्रास्तृत प्रकरणी तपतशीलात नमुद प्रमाणे प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीस ही सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत  सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| २१. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालयासाठी वृत्तपत्र, मासिके, नियतकालीके या लेखाशिर्षामध्ये तरतुद कमी असल्याने पुनःविनियोजनास मान्यता देणेबाबत. | ठराव :- सदर विषयावर आजच्या मा.स्थायी समिती सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार अभ्यासिका वर्ग खोल्या भाडे या लेखाशिर्षातुन रू. ७ लक्ष इतकी रक्कम सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात वापरली गेली नसल्याने सदर तरतुद वृत्तपत्र, मासिके, नियतकालीके या लेखाशिर्षामध्ये वर्ग करण्यांत यावी व पुढील येणारी देयके अदा करणेंस मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना. पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २२. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका विरार पाणी पुरवठा विभागाअंतर्गत प्रभाग समिती ए/सी पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे कामी संविदा करणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे.ॲशलॉन एंटरप्रायजेस यांची वाटाघाटीअंती सादर केलेला १२% जादा (CSR शी तुलनेत ५.४१% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून सदर कामाची मुदत ३ वर्षे राहिल. महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार ही सभा मान्यता देण्यांत येत असून शासन निर्णय/परिपत्रकानुसार तसेच निविदा मुल्यांकनात दर्शविण्यांत आल्याप्रमाणे वेळोवेळी किमान वेतनावरील जाहिर करण्यांस येणारा वाढीव महागाई भत्ता ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक असून त्यानुसार येणाऱ्या एकूण खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.नितीन राऊत सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २३. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका नालासोपारा पाणी पुरवठा विभागाअंतर्गत प्रभाग समिती बी/ई पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे कामी संविदा करणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. आर.जी.कन्स्ट्रक्शनयांची वाटाघाटीअंती सादर केलेला १२% जादा (CSR शी तुलनेत ५.१०% जादा) दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून सदर कामाची मुदत ३ वर्षे राहिल. महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार ही सभा मान्यता देण्यांत येत असून शासन निर्णय/परिपत्रकानुसार तसेच निविदा मुल्यांकनात दर्शविण्यांत आल्याप्रमाणे वेळोवेळी किमान वेतनावरील जाहिर करण्यांस येणारा वाढीव महागाई भत्ता ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक असून त्यानुसार येणाऱ्या एकूण खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २४. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका नालासोपारा पाणी पुरवठा विभागाअंतर्गत प्रभाग समिती डी/एफ पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे कामी संविदा करणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे.आर.जी.कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीअंती सादर केलेला १२% जादा (CSR शी तुलनेत ४.५९% जादा) दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून सदर कामाची मुदत ३ वर्षे राहिल. महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार ही सभा मान्यता देण्यांत येत असून शासन निर्णय/परिपत्रकानुसार तसेच निविदा मुल्यांकनात दर्शविण्यांत आल्याप्रमाणे वेळोवेळी किमान वेतनावरील जाहिर करण्यांस येणारा वाढीव महागाई भत्ता ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक असून त्यानुसार येणाऱ्या एकूण खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| २५. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका नवघर पाणी पुरवठा विभागाअंतर्गत प्रभाग समिती जी/एच पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे कामी संविदा करणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे.ॲशलॉन एंटरप्रायजेस यांची वाटाघाटीअंती सादर केलेला १२% जादा (CSR शी तुलनेत ५.४४% जादा) दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून सदर कामाची मुदत ३ वर्षे राहिल. महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार ही सभा मान्यता देण्यांत येत असून शासन निर्णय/परिपत्रकानुसार तसेच निविदा मुल्यांकनात दर्शविण्यांत आल्याप्रमाणे वेळोवेळी किमान वेतनावरील जाहिर करण्यांस येणारा वाढीव महागाई भत्ता ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक असून त्यानुसार येणाऱ्या एकूण खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्रीम.दिक्षा घरत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २६. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका वसई पाणी पुरवठा विभागाअंतर्गत प्रभाग समिती आय पाणी पुरवठा व्यवस्थापन करणे कामी संविदा करणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व मे. आर.जी.कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीअंती सादर केलेला १२% जादा (CSRशी तुलनेत १.६७% जादा) दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून सदर कामाची मुदत ३ वर्षे राहिल. महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार कामाची संविदा करण्यांस मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार ही सभा मान्यता देण्यांत येत असून शासन निर्णय/परिपत्रकानुसार तसेच निविदा मुल्यांकनात दर्शविण्यांत आल्याप्रमाणे वेळोवेळी किमान वेतनावरील जाहिर करण्यांस येणारा वाढीव महागाई भत्ता ठेकेदाराने कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक असून त्यानुसार येणाऱ्या एकूण खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २७ | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी टि.सी.एल पावडर पुरवठा करणे कामी संविदा करणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. मे. सुपारी बाग मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ मर्यादित यांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या वाटाघाटीअंती २०% जास्त दराच्या निविदेस मान्यता देण्यांत येत असून सदर कामाची मुदत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या अधिन राहून मुदत ३ वर्षे राहिल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ क) नुसार कामाची संविदा करण्यांस मा. आयुक्त यांचे शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका